म. ग्रं. सं. ठाणें

| विषय | | सन |
| --- | --- | --- |
| चरित्र | लेखक महाराष्ट्र कोकीलकर्ते | १८९२ |
| संग्रहालय क्रमांक ४३५ | पुस्तकाचें नांव वामन शिवराम आपटे चरित्र | |

४३५

५४

सं. क्र.

चरित्र

( 'महाराष्ट्रकोकिल' मा. पु., वर्ष २ रें, अंक ३ रा, ह्यांत छा. प्र. झालेलें )

प्रिन्सिपाल

# वामन शिवराम आपटे, एम्. ए.,

( फर्ग्युसन कॉलेज, पुणें )

ह्यांचें

## संक्षिप्त सचित्र चरित्र.

हें लहानसें पुस्तक

**मराठी लिटररी सोसायटी,**

गिरगांव पोस्ट, मुंबई, ह्यांनीं

मुंबईत "तत्वविवेचक" छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

---

सप्टेंबर १८९२.

---

किं. ६ पै.

सुंदर आणि उपयुक्त, स्वस्त व मजेदार नवीन!

# भारतभाग्योदय

अथवा

## नागपूर येथील ७ व्या राष्ट्रीय सभेचें साद्यंत वर्णन व मागील ६ राष्ट्रसभांची संक्षिप्त माहिती.

ह्या पुस्तकांत नागपूर येथें भरलेल्या ७ व्या राष्ट्रीयसभेचें साद्यंत वर्णन फार प्रेमळ व चटकदार भाषेंत लिहिलें आहे. तें वाचलें असतां सभेचा अपूर्व व मनोहर देखावा मूर्तिमंत दिसूं लागतो. सर्व वक्त्यांचीं भाषणें आणि त्या त्या वेळचें सभेचें रमणीय स्वरूप ह्या पुस्तकांत फारच कुशलतेनें वर्णिलें आहे. हें पुस्तक नागपूर येथील राष्ट्रीयसभेच्या स्वागतमंडळीचे अध्यक्ष लोकप्रिय सद्गृहस्थ मि० नारायणस्वामी नायडू यांस समर्पण केलें असून प्रारंभीं त्यांचें सचित्र मनोरम चरित्रही दिलें आहे, व शेवटीं मागील ६ राष्ट्रीयसभांची संक्षिप्त माहिती देऊन सुंदर कविता घातल्या आहेत. हें पुस्तक अत्यंत लोकप्रिय झाल्यामुळें त्याच्या ५,००० प्रतींपैकीं फारच थोड्या प्रती शिल्लक आहेत, व त्या दररोज संपत चालल्या आहेत. भारतभाग्योदय पुस्तकाचीं एकंदर बारीक टाईपाचीं ७५ पृष्ठें असून छपाई सुरेख आहे. आंतील मजकुराबद्दल सर्व पत्रकर्त्यांनीं व विद्वानांनीं फारफार प्रशंसा केली आहे. त्यांपैकीं फक्त दोघां विद्वान पत्रकारांचे संक्षिप्त अभिप्राय खालीं दिले आहेत:—

१ **केसरी** (पुणें, ता. १४ – ६ – ९२) "+ + + समारंभाची हकीकत सभेचा बातबेत, मुख्यमुख्य राष्ट्रीयसभाभक्तांचें वर्णन, यांनें या छोट्याशा पुस्तकास जास्त मनोरमत्व आलें आहे. करितां, प्रत्येक राष्ट्रीयसभेची माहिती मिळवूं इच्छिणारानें दोन आणे खर्च करून हें पुस्तक एकदां तरी वाचावें अशी आमची त्यास शिफारस आहे."

२ **देशसेवक** (नागपूर, ता. १० – ७ – ९२) " + + + ह्या पुस्तकांत वापरलेली भाषा फार चटकदार आहे. वर्णन करण्याची शैली अशी कांहीं मार्मिक आहे कीं, वाचणाराचे मनांत त्या वेळचें हुबेहुब चित्र उभें राहतें. 'प्रतिनिधींस मेजवानी' हा भाग वाचला असतां आमचें म्हणण्याची सार्थकता वाचणाराचे मनांत येईल......सारांश, हें लहानसें पुस्तक प्रत्येक मराठी भाषा जाणणाराचे संग्रहीं असावें अशी आम्ही शिफारस करितों."

☞ **ह्याशिवाय पुष्कळ उत्तम अभिप्राय आले आहेत.**

**किंमत**—१ प्रतीस २ आणे, ट. ह. अर्धा आणा. ५ प्रतींस ट. ह. माफ. १० प्रतींस ट. ह. माफ व एक प्रत बक्षीस.

**महाराष्ट्रकोकिल** किंवा **मासिकवृत्तमाला** ह्या पुस्तकांच्या ज्या वर्गणीदारांकडून अक्टोबरअखेर वर्गणी येईल त्यांस ट.ह.सह फक्त १॥ आणा पडेल.

**पत्ता—मराठी लिटररी सोसायटी, गिरगांव पोस्ट, मुंबई.**

५/९३

मराठी ग्रंथ संग्रहालय
ठाणे

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं. ५ ११६
ठाणे

प्रिन्सिपाल
वामन शिवराम आपटे, एम्. ए.



सं. ५. ७२
ग्रंथ संग्रहालय नं० ठाणे सन
३४६
३२०
५
१९१२

# प्रिन्सिपाल वामन शिवराम आपटे, एम्. ए.

अंजलिरकारि लोकैर्म्लानिमनाप्यैव रंजिता जगती ॥
संध्याया इव वसतिः स्वल्पापि सखे सुखायैव ॥ १ ॥ *

ह्या **संस्कृत** वचनाचा अर्थ असा आहे कीं, संध्यासमयाची स्थिति जरी अल्पकाल असते, तरी लोकांनीं हात जोडले आहेत, स्वतःचें तेज मलिन न होऊन त्यानें सारी पृथ्वी रंजित झालेली आहे, अशा रीतीनें त्याचा लय होतो; तर ह्याप्रमाणें थोरांची स्वल्पकालिक वसतीही सुखप्रद होते. हें अगदीं खरें आहे. ह्याचें कारण, त्या संध्यासमयाच्या अंगीं जसें कांहीं विशेष तेज असतें, तसें थोर पुरुषांच्या अंगींही असतें, त्यामुळें त्यांचा इहलोकांतील अल्पकालिक वास देखील सर्वांच्या सुखास–पर्यायें करून कल्याणास–कारणीभूत होतो. अशा प्रकारचे–ह्मणजे आपल्या अल्प सहवासानें सर्व **महाराष्ट्रास** सुखप्रद आणि प्रिय होऊन नुकतेंच कैलासवासी झालेले–थोर गृहस्थ **प्रिन्सिपाल वामन शिवराम आपटे** हे होत. ह्यांचें संक्षिप्त चरित्र आह्मीं येथें सादर करण्याचें योजिलें आहे.

---

* ह्याच **संस्कृत** उक्तीच्या आशयाची एका प्रसिद्ध **आंग्ल**ग्रंथकाराची उक्ति आहे. ती येथे दाखल केली असतां वाचकांस अर्थसादृश्याचाही मासला कळेल, आणि उत्तम बोधाचाही लाभ होईल असें वाटतें :—

"It is not growing like a tree
In bulk, doth make Man better be;

Or standing long an oak, three hundred year,
To fall a log at last, bald, dry and sere:

A lily of a day
Is fairer far in May,

Although it fall and die that night—
It was the plant and flower of Light,

In small proportions we just beauties see;
And in short measures life may perfect be."

—Ben Jonson.

**सावंतवाडी** संस्थानामध्यें **बांदें** या नांवाचा एक पेटा आहे. त्यांत **आसोलीपाल** ह्या नांवाचें एक खेडें गांव आहे. तेथें सन १८९८ सालीं **वामनरावां**चा जन्म झाला. त्यांच्या वडिलांचें नांव **शिवराम रावजी आपटे** असें होतें. हे **वामनरावां**च्या वयाच्या चौथ्या वर्षाचे सुमारास मृत्यु पावले. तेव्हां त्यांच्या पत्नि–ह्मणजे **वामनरावां**च्या मातुश्री–ह्या आपलीं अल्पवयी बालकें बरोबर घेऊन **कोल्हापुरास** येऊन राहिल्या. तेथें त्यांचा **बाळकृष्ण** ह्या नांवाचा १४।१५ वर्षांच्या वयाचा मुलगा सन १८६९ चे सुमारास मृत्यु पावला. त्यामुळें त्या साध्वीस पुत्रशोकाचा धक्का बसून तीही त्याच्यामागून गत झाली. त्यामुळें **वामनराव** व त्यांचे वडील बंधु **माधवराव** अशीं दोन बालकें अगदीं अनाश्रित व दीन होऊन गेलीं. परंतु, अनाथांचा नाथ जो परमेश्वर त्यानें त्यांवर आपला सदय हस्त ठेविल्यामुळें त्यांचें बालपण सुसंरक्षितपणें शेवटास गेलें!

मनुष्याच्या सर्व आयुष्यामध्यें बालपणासारखी मजा नाहीं. बाल्यस्थिति ह्मणजे आनंदाचें वसतिस्थानच होय. कारण, त्या स्थितीमध्यें कोणत्याही प्रकारें संसाराचा व्याप पाठीमागें लागलेला नसतो. पण, असें आनंदप्रद बालपण ह्या दोन मुलांस मात्र लाभलें नाहीं; असें मोठ्या दुःखानें ह्मणावें लागतें! कारण, त्यांचीं मातापितरें लौकर नष्ट झाल्यामुळें त्या बालकांस पितृवात्सल्याचें अप्रतिम सुख मुळींच सांपडलें नाहीं! **वामनरावजी** आठ वर्षांचे झाले नाहींत तोंच त्यांच्यामागें माधुकरीची झोळी लागली!! परंतु, अशा दुःखद स्थितींतही त्यांनीं मोठ्या उल्हासानें विद्यासंपादनाचें काम सुरू ठेविलें. सुमारें दहा वर्षांच्या आंत, त्यांनीं **मराठी** भाषेचा अभ्यास संपूर्ण करून **इंग्रजी** शिकण्यास प्रारंभ केला. **करवीर** नगरींत त्या वेळीं **आंग्लशालाध्यापकाचें** काम **कै० महादेव मोरेश्वर कुंटे** यांच्याकडे होतें. त्यांच्या कारकीर्दींत त्यांनीं उत्तम प्रकारें अभ्यास करून आपल्या सहाध्यायी वर्गामध्यें अग्रस्थान मिळविलें. **वामनरावजीं**ची स्थिति अगदीं दारिद्र्यानें गांजलेली असल्यामुळें, ते केव्हांकेव्हां आपल्या वर्गांतील मुलांस गणित व **संस्कृत** ह्या दोन विषयांची समजूत देत, आणि त्यांना प्रसन्न करून त्यांच्या जवळील पुस्तकें घेऊन आपला अभ्यास करीत. हें पाहून, त्यांचे गुरुवर्य त्यांस एकदां असें ह्मणाले कीं, '**वामना**, तूं पुढें

मोठा अध्यापक होणार कां रे?' खरोखर, हे शब्द **वामनरावांच्या** भावी उच्च स्थितीचे दर्शक नव्हेत काय? असो.

**वामनरावांची** प्रवेशपरीक्षा ( Matriculation ) सन १८७३ सालीं झाली. त्या वेळीं **वामनराव** उत्तम प्रकारें पसंत ठरून त्यांना 'जगन्नाथ शंकर शेटजीं'ची पहिली रु. २९ ची **संस्कृत** स्कालरशिप देण्यांत आली. पुढें ते उच्च प्रतीचें शिक्षण संपादण्याकरितां दक्षिण पाठशाले ( Deccan College ) मध्यें आले. तेथें त्यांचें बुद्धिचापल्य जास्तजास्त प्रकाशित होऊं लागलें. दक्षिण विद्यालयांतील विद्वान् गुरुजनांचें त्यांच्यावर अधिकाधिक प्रेम जडूं लागलें. त्यांचा अभ्यासाचा नियमितपणा, स्मरणशक्ति, पुस्तकांची व इतर स्मरणवह्यांची टापटीप हीं पाहून अस्ताव्यस्त विद्यार्थ्यांनीं खालींच मान घालावी! **वामनरावजींस** भाषाविषय फार प्रिय असे, आणि त्यांतल्या त्यांत त्यांस गीर्वाण वाणीची तर पराकाष्टेची भक्ति होती. त्यामुळें त्यांच्या नेत्रांखालून कविकुलगुरु **कालिदासादिकांचीं** सुंदरसुंदर काव्यें नेहमीं जात असल्यामुळें त्यांच्या ठिकाणीं रसाभिज्ञता हा गुण उत्पन्न झाला होता. त्यामुळें त्यांच्या बुद्धिमत्तेस एक प्रकारचें सौंदर्य प्राप्त झालें. त्यांच्या हुषारीची फारफार प्रशंसा होऊं लागून प्रत्येक परीक्षेमध्यें त्यांना पारितोषिकें मिळूं लागलीं. सन १८७५ सालीं त्यांची श्रेष्ठ प्रतीची पहिली परीक्षा ( F. A. ) झाली. तींत त्यांना तीन इनामें मिळून एकंदर ४९ रुपये दरमहा मिळूं लागले. सन १८७६ सालीं त्यांची शेवटची पदप्राप्तीची ( B. A. ) परीक्षा व्हावयाची, परंतु त्या वेळीं **मि० पीटरसन** ह्यांच्याविरुद्ध विद्यार्थिमंडळानें कांहीं अर्ज केल्यामुळें त्यांच्या उद्धत वृत्तीबद्दल श्रेष्ठ वर्गांतील विद्यार्थ्यांना एक वर्ष परीक्षेस न घेण्याचा ठराव झाला. त्यामुळें **वामनरावजींचें** एक वर्ष व्यर्थ गेलें! परंतु, त्या योगानें त्यांना असा बोध मिळाला कीं, कधींही कोणाच्या भानगडींत पडूं नये. हेंच तत्त्व **वामनरावांच्या** हृदयांत पूर्णपणें बाणलें गेल्यामुळें, ते कधींही समाजांतील भानगडींत पडत नसत असें ह्मणतात.

असो. सन १८७७ सालीं **वामनरावजींची बी. ए.** पदप्राप्तीची परीक्षा उत्कृष्ट रीतीनें पसार झाली. नंतर त्यांनीं **एम्. ए.** परीक्षेच्या अभ्यासास प्रारंभ केला, व ते सन १८७९ सालीं त्याही परीक्षेस बसले,

व सुदैवानें तींत ते सन्मानपूर्वक पसंत ठरले. त्याबद्दल त्यांस ४०० रुपयांचें 'भगवानदास स्मारक' बक्षीस मिळालें. येथें **वामनरावजींच्या** अध्ययनस्थितीची परिसमाप्ति होऊन ते जगांतील रंगभूमीवर आले एवढें सांगणें अवश्य आहे.

सन १८७७ सालीं **पुण्यनगरस्थ** प्रसिद्ध देशभक्त **रा. रा. गणेश वासुदेव जोशी** ऊर्फ **सार्वजनिक काका,** ह्यांनीं आपल्या मुलीचा विवाह करण्याचा निश्चय केला. ते जात्याच व्यवहारचतुर व सत्यप्रिय असल्यामुळें, त्यांनीं आपल्या कन्येला खरोखर हुशार वर पाहण्याचा निश्चय केला. त्याप्रमाणें ते शोध करीत असतां, **वामनरावजींच्या** कुशाग्रबुद्धिची आणि विद्वत्तेची कीर्ति त्यांच्या कानावर गेली. तेव्हां, त्यांनीं **वामनरावजींची** चौकशी करून, त्यांसच आपली कन्या देण्याचें योजिलें! **वामनरावजी** जरी विद्यापर्वताच्या अत्युच्च शिखरावर जाऊन पोहोंचले होते तरी आयुष्यक्रमणाचें आवश्यक साधन जें द्रव्य त्याचा पूर्वार्जित संचय त्यांच्याजवळ मुळींच नव्हता. त्यामुळें असल्या निर्द्रव्यास, लक्ष्मीच्या विलासांत रुळलेली कन्या मिळण्याचा मुळीं संभवही नव्हता! परंतु, **काकांनीं** त्यांच्या अलौकिक बुद्धिमत्तेवर नजर देऊन **वामनरावजींस** आपली कन्या सालंकृत दान केली! ही सहचारिणी जरी सुस्वरूप नव्हती तरी **वामनरावांस** अत्यंत प्रिय वाटत असे. ह्या सुशीलेच्या पोटीं **वामनरावजींस** दोन कन्या व एक पुत्र अशीं तीन अपत्यें झालीं!! पैकीं एक अष्ट वर्षांची कन्या मात्र जिवंत आहे!!!

**वामनरावजी** विद्यापर्वताचें अत्युच्च शिखर ओलांडून आपल्या आयुष्यक्रमणाच्या गंभीर विचारतरंगामध्यें पडले, तों त्यांस प्रथम सरकारी नोकरी प्रिय वाटून, त्यांनीं कांहीं काळपर्यंत तिकडे मन वळविलें. परंतु, ह्या समयास त्यांचे कित्येक सहाध्यायी मित्र 'परोपकारार्थ मिदं शरीरं' ह्या सर्वश्रेष्ठ तत्त्वाचे पूर्ण अंकित होऊन स्वदेशसेवेच्या महत्कार्यार्थ उद्युक्त झाले, त्यामुळें त्यांचेंही मन तिकडे आकर्षित होऊन त्यांनीं आपली दास्यशृंखला तेव्हांच तोडून टाकिली. तो प्रकार येणेंप्रमाणें:—

**प्रोफेसर आगरकर** हे एम्. ए. परीक्षेचा अभ्यास करीत असतांना व **प्रो. टिळक** हे एल्एल्. बी. चा अभ्यास करीत असतांना, त्यांच्या मनांत शिक्षणदानार्थ स्वतंत्र संस्था उभारण्याचे निरनिराळे विचार घोळूं

लागले. व त्यांनीं कित्येक थोर गृहस्थांच्या विचारानें, आणि कित्येक सन्मित्रांच्या सहाय्यानें, सन १८८० सालीं **पुण्यामध्यें** 'नवीन इंग्रजी शाळा' (न्यू इंग्लिश स्कूल) संस्थापित केली. **प्रो. आगरकर** व **टिळक** ह्यांना ही शाळा संस्थापित करण्यांत ज्या अत्यंत बाणेदार, विद्वान् व स्वदेशाभिमानी गृहस्थांची उत्तम मदत झाली त्यांचें नांव सर्व महाराष्ट्रीयांस विश्रुत आहेच. **कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर** हे ह्या शिक्षणसंस्थेचे केवळ जनक होत ह्मणून त्यांचा जो लौकिक आहे तो उगाच नव्हे. **रत्नागिरी** येथें सरकारी शाळेंत अध्यापक असतांना **शास्त्रीबावांस** परवशतेची तिखट सुरी उरीं लागून, त्यांना एकदम स्वतंत्र होण्याची इच्छा झाली, व त्याप्रमाणें त्यांनीं पारतंत्र्यशृंखलेंतून आपली मुक्तता करून घेतली. **शास्त्रीबावा पुण्यास** येऊन पूर्वोक्त मित्रद्वयांस स्वदेशसेवेच्या कार्यांत कायावाचामनेंकरून सहाय्य करण्यास सिद्ध झाले. त्यांच्या हेतूप्रमाणें 'नवीन इंग्रजी शाळे'ची संस्थापना होतांच, **टिळक**प्रभृति मंडळीच्या प्रयत्नानें **वामनरावजी आपटे** हेही त्यांस येऊन मिळाले, व **विष्णुशास्त्री, टिळक, आगरकर, आपटे,** आणि **नामजोशी** ह्या सद्गृहस्थांचें एक पंचायतनच बनलें. ह्या मंडळीनें 'नवीन इंग्रजी शाळे'बरोबर **मराठा** व **केसरी** हीं दोन वृत्तपत्रें सुरू केलीं. ह्या वृत्तपत्रांवर सन १८८२ सालीं जो प्रसंग गुदरला तो सर्व प्रसिद्धच आहे. ह्या प्रसंगानें ह्या मित्रपंचायतनामध्यें आपपरभाव मुळींच नाहीं असें उत्तम प्रकारें सिद्ध झालें! **केसरी** व **मराठा** ह्या पत्रांमध्यें अनुक्रमें **शास्त्रीबावा** व **आपटे** ह्यांचे कित्येक लेख असून त्याबद्दल कारागृहवास कोणास भोगावा लागला ह्याचा विचार केला ह्मणजे ह्या मंडळीचें अकृत्रिम प्रेम किती होतें हें निराळें सांगावयास नकोच!! **लॉर्ड बेकन** नामक सुप्रसिद्ध तत्त्ववेत्त्यानें 'मित्र ही आपली दुसरी प्रतिमाच होय' (Friend is another myself) ह्मणून जें ह्मटलें आहे त्याचें सत्यत्व ह्या मंडळीच्या उदाहरणावरून मूर्तिमंत दिसून येतें. असो.

सन १८८२ सालीं **शास्त्रीबावा**सारखा मोहरा नाहींसा झाला, व **टिळक, आगरकर** ही जोडी दुर्दैवानें कारागृहवासांत गुंतली, त्यामुळें त्यांच्या दीर्घ प्रयत्नानें नुकतीच उदयास आलेली शिक्षणसंस्था विलयास जाणार कीं काय अशी सर्वांस काळजी वाटूं लागली. परंतु, **वामन-**

**रावजी आपट्यांनीं** ह्या प्रसंगीं अशा रीतीनें तिचें संगोपन केलें कीं, त्या योगानें तिचीं मूळें दृढतर होऊन गेलीं.

**वामनरावजीं**च्या ठिकाणीं स्वकार्यदक्षता हा अप्रतिम गुण चांगल्या प्रकारें वसत असल्यामुळें व त्यांचे सहकारी मित्र चांगले विद्वान् व मेहनती असल्यामुळें, दिवसेंदिवस 'नवीन इंग्रजी शाळे'चा जास्तजास्त अभ्युदय होत गेला. ह्या शाळेंतील शिक्षणपद्धति आणि अध्यापक वृंदांची विद्वत्ता लोकप्रसिद्ध होऊन त्यांची सत्कीर्ति सरकाराच्या कानावर गेली. ह्या शाळेंतील मुलांस प्रतिवर्षीं **जगन्नाथ शंकरशेट** ह्यांची शिष्यवृत्ति ( scholarship ) मिळूं लागून तिचा चांगला उत्कर्ष झाला. अशा प्रकारें **वामनरावजीं**च्या श्रमास थोडींथोडी सफलता येत गेली. त्यामुळें त्यांनाही जास्त उमेद येऊन, उच्च प्रतीचें शिक्षण देण्याची योजना करावी अशी इच्छा उत्पन्न झाली.

सन १८८४ सालीं अक्टोंबर महिन्यांत 'डेक्कन एज्युकेशन सोसायटी' ( दक्षिणप्रांतस्थ विद्यामंडळी ) संस्थापित झाली, व तदनंतर सन १८८५ च्या प्रारंभास 'फर्ग्युसन कालेज' निघालें. तेव्हांपासून **वामनरावजी** हे त्या श्रेष्ठ विद्यालयाचे प्रमुख गुरु असून तदोत्कर्ष चिंतण्यांत नेहमीं तत्पर असत. हळूहळू त्यांनीं दीर्घोद्योग करून पाठशालेचा एकएक वर्ग वाढविला, आणि तिला श्रेष्ठ प्रतीची पाठशाला करून सोडिलें. बी. ए. ही पाठशालेंतील शेवटची परीक्षा असते. त्या परीक्षेचा अभ्यास शिकविण्याची परवानगी त्यांनीं नुकतीच मिळविली होती. त्या परीक्षेमध्यें आपल्या छात्रवर्गांतील एकतरी विद्यार्थी उत्तीर्ण झालेला पाहून कृतकृत्य व्हावें असा **वामनरावजीं**चा फार हेतु होता. परंतु, तो सिद्धीस नेणें त्या **कृतांतास** कोठून आवडणार?

**वामनरावजी** हे जात्या शांतस्वभावी, निर्व्यसनी, सततोद्योगी असे असत. त्यांना सार्वजनिक कृत्यें करण्याची जरी उत्सुकता असे तरी व्यर्थ पुढेंपुढें करून लब्ध प्रतिष्ठा मिळविण्याची त्यांना बिलकुल इच्छा नसे. सार्वजनिक सभा व वक्तृत्व सभा ह्या दोन संस्थांशीं त्यांचा थोडा बहुत संबंध असे, आणि केव्हां केव्हां वसंतव्याख्यानसमारंभांत त्यांची वामनमूर्ति चमकत असे; तथापि 'शिक्षण संस्था आणि त्यांचा अभ्युदय' एवढी गोष्ट मात्र त्यांच्या अंतःकरणांत अगदीं दृढ-

लेप झाली होती. त्यांनीं आपल्या विद्यार्थिवर्गासाठीं 'संस्कृत गाईड,' 'प्रॉग्रेसिव्ह एक्सरसाईजेस,' 'कुसुममाला,' आणि 'संस्कृत-इंग्रजी' व 'इंग्रजी-संस्कृत कोश' इत्यादि पुस्तकें लिहिलीं आहेत. त्यांच्या योगानें **वामनरावजींचें** नांव सर्वतोमुखीं होऊन राहिलें आहे. त्यांच्या **संस्कृत** कोशाची नुसती वाहवा झाली आहे एवढेंच नव्हे, पण **कलकत्ता, मद्रास** वगैरे इलाख्यांतील अनेक **संस्कृत**भाषाप्रवीण पंडितवरांनीं त्यांबद्दल **वामनरावजींचें** अत्यंत अभिनंदन केलें आहे.

**संस्कृत** भाषेच्या अध्यापनांत **वामनरावजी** फारच कुशल असत. ते वर्गामध्यें **संस्कृत** नाटकग्रंथ शिकवावयास लागले ह्मणजे त्यांच्या मार्मिक विवेचनानें छात्रवर्ग अगदीं तल्लीन होऊन जात असे. त्यांच्या एका विद्वान् सहकाऱ्यांनीं त्यांच्या अध्यापनपटुत्वाबद्दल असे उद्गार काढिले आहेत कीं, "नेटिव संस्थानांचा कारभार पहाण्याचे कामीं ज्या प्रकारचें नैपुण्य **राजे सर टी. माधवराव** यांचें अंगीं होतें, त्या प्रकारचें नैपुण्य शाळा चालविण्याचे कामांत **रा० आपटे** यांचें अंगीं होतें, असें ह्मणण्यास आह्मांस बिलकुल शंका वाटत नाहीं."

असो. अशा रीतीनें **वामनरावजींचा** कार्यक्रम चालला असतांना, व त्यांच्या योगानें सर्व **महाराष्ट्रास** चांगला शिक्षणलाभ होत असतांना, मालतीमाधव नाटकांतील 'आपूर्णश्च कलाभिरिन्दुरमलो यातश्च राहोर्मुखम्' ह्या **भवभूती** कवीच्या उक्तीप्रमाणें आगस्ट महिन्याच्या ९ व्या तारखेस मंगळवारीं प्रातःकाळीं दहा वाजतां **पुणें** शहरीं एकाएकीं **वामनरावजींस** सर्वभक्षक **यमराजांनीं** आपल्या पाशांत ओढून घेतलें ही केवढी दुःखाची गोष्ट होय? त्यांस निमित्त मात्र विषमज्वराची भावना झाली, व त्यांच्या आप्तसुहृदांनीं अनंत औषधोपचार केले; परंतु भवितव्यता कशानें चुकणार? **वामनरावजींच्या** मृत्यूचें शोककारक वृत्त **पुण्य**नगरीमध्यें चोहोंकडे पसरतांच त्यांचा सर्व छात्रवृंद आणि मित्रसमूह अगदीं निस्तेज होऊन, **वामनरावजींचें** शेवटचें दर्शन घेण्यास तेव्हांच त्यांच्या घरासभोंवतीं जमला! त्यांचे सहकारी मित्रजन शोकाकुल होऊन, स्फुंदस्फुंदून नेत्राश्रु टाकूं लागले!! त्यांची प्रियपत्नी शोकसागरांत बुडून गेली!! अशा प्रकारें जिकडे तिकडे शोककल्लोळ व रुदनस्वर ऐकूं येऊं लागले!! ह्या दुःखद प्रसंगाचें वर्णन करण्यास आमची लेखणी असमर्थ आहे!!

असो. **वामनरावजींच्या** परलोकगमनानें सर्व **पुण्यनगरवासी** लोकांसच अत्यंत दुःख झालें असें नसून, सर्व **महाराष्ट्र**–किंबहुना सर्व **मुंबईइलाखा**-दुःखानें व्याप्त झाला आहे ह्यांत शंका नाहीं. त्यांच्या मृत्युसंबंधानें **जस्टिस तेलंग**, डेक्कन कालेजाचे प्रिन्सिपाल **मि० सेल्बी,** एल्फिन्स्टन कॉलेजाचे प्रिन्सिपाल **मि० आक्झनहॅम** वगैरे मोठमोठ्या मंडळींनें फारफार दुःख प्रदर्शित केलें आहे. **मुंबईचे** गव्हरनर **लॉर्ड ह्यारिस** ह्यांनीं देखील **पुणें** येथील गायनसमाजांत **आपटे** यांचे गुणानुवाद गाऊन फारफार खेद प्रदर्शित केला!* तेव्हां नामदार **गव्हरनर** साहेबांपासून तो लहान मुलापर्यंत ज्यांच्या वियोगानें सर्व लोक शोकाकुल झाले आहेत त्यांच्या गुणांचें व लोकप्रियतेचें दुसरें उदाहरण आह्मीं तें काय सांगावें?

खरोखर, **वामनरावजींनीं** आपलें ऐहिक कर्तव्य उत्तम रीतीनें बजावून, **'सर्वांमुखीं मंगल बोलवावें'** ह्या वचनास आपणांस पूर्णपणें पात्र करून घेतलें ह्यांत शंका नाहीं. त्यांच्या आत्म्यास चिर शांति, व त्यांच्या 'वियोगें जिणें वर्जिलें अन्नपाणी । मुखातें सदा वाहतें खिन्न पाणी ॥' अशा स्थितींत पडलेल्या धर्मपत्नीस दुःखाचें परिमार्जन करण्याची शक्ति हीं देण्याबद्दल परमेश्वराची प्रार्थना करून, व त्यांनीं ज्या संस्थांस उत्कर्ष स्थितीप्रत पोंहचविलें त्यांचा पूर्ण अभ्युदय करण्याबद्दल **वामनरावजींच्या** सहकारी मित्रवर्गास विनंति करून आह्मी हें अल्प चरित्र येथें संपवितों.

---

* **नामदार लॉर्ड ह्यारिस** ह्यांनीं **पुणें** येथील गायनसमाजांत **कै० आपटे** यांच्यासंबंधानें जे दुःखोद्गार काढिले ते येणेंप्रमाणें:—

The name of the first (Mr. Apte) brings the most regretful thoughts. Death has been busy here in the city and cantonment this last month, and amongst those whom you have to mourn, none, I fancy, has passed away with more sincere and deeper feelings of regret than Mr. Apte. I beg very respectfully to join with you in those feelings. I know what Mr. Apte was doing for education here. I know what a labour of love it has been to him to extend the efforts of educational association with which he was connected, and how successful that labour has been. We can ill spare such enthusiasts, but we must bow before the greater wisdom of the Almighty. I name Mr. Apte in connection with that doctrine of self-help which I am taking the liberty to inculcate, because I believe him to be a notable instance of a man raising himself to the highest level in his own line by the unaided determination of his character and his self-confidence in his power to succeed.

—SUDHARAK, *22nd August 1892.*

मराठी भाषेंतील स्वस्त व सुंदर मासिक पुस्तक.

# महाराष्ट्र कोकिल.

( पृष्ठें एकंदर ३२, छपाई सुरेख, आणि कागद मोहरेदार. )

हें मासिक पुस्तक जुलै १८९१ पासून मुंबई येथें प्रसिद्ध होऊं लागून त्याच्या द्वितीय वर्षास नुकताच प्रारंभ झाला आहे. इतक्या अल्पावकाशांत ह्या मासिक पुस्तकास २,००० वर्गणीदार मिळून तें सर्वप्रिय झालें आहे. ह्यामध्यें प्रसिद्ध पुरुषांचीं चरित्रें, सुंदर काव्यें, शास्त्रीय चमत्कार, लोकोत्तर माहिती, स्थलवर्णनें, नीतिपर निबंध, मजेदार ऐतिहासिक आख्यायिका, स्वतंत्र इतिहास, इ. इ. इ. अनेक चटकदार लेख प्रसिद्ध होतात. भाषा फार सभ्य व सुबोध असून मजेदार असते. प्रथम वर्षांत डाक्टर राजेंद्रलाल मित्र, महंत केशव रामराय, वीर राघव चारियर, पंडित अयोध्यानाथ, रायबहादूर आनंदाचार्लू, नारायणस्वामी नायडू, आणि डब्ल्यू. सी. बानर्जी इत्यादि लोकप्रसिद्ध पुरुषांचीं मनोरम चरित्रें; राष्ट्रीय बालसभा, पंडित ईश्वरचंद्र यांचा मृत्यु, कोकिलास भेट वगैरे सुंदर काव्यें; सुगृहिणी भाग्य आणि सुजनत्व वगैरे निबंध, आफ्रिका खंडांतील दुर्दैवी स्त्रिया, कुकी लोक, काचीन लोक, आणि अंदमानी लोक इत्यादिकांची मजेदार माहिती; चंद्रप्रकाशांतील इंद्रधनुष्य, कृत्रिम पर्जन्यवृष्टि, काको येथील मिठाच्या खाणी, वगैरे महत्वाची माहिती; गिरसप्पा येथील धबधबा, जयपूर, सोमनाथ, भेडा घाट, वगैरे मनोहर स्थलवर्णनें; जादुगारांचे अद्भुत खेळ, गाणारे मासे, टिपूच्या जनानखान्याची माहिती, लोकोत्तर निद्राभंग, अद्भुत शक्तीच्या दोन स्त्रिया, अर्वाचीन घटना वगैरे चमत्कारिक विषय; आख्यायिका आणि पुस्तकपरीक्षण वगैरे अनेक सुंदर विषय प्रसिद्ध झाले आहेत. त्यापेक्षांही ह्या वर्षी कोकिल सुंदर गायन करीत आहे. गेल्या वर्षापासून ह्या मासिक पुस्तकामध्यें श्रीमंत दामोदररावसाहेब झांशीवाले—सुप्रसिद्ध व अतुल पराक्रमी झांशीच्या महाराणी लक्ष्मीबाईसाहेब ह्यांचे दत्तक पुत्र—हे झांशी संस्थानच्या इतिहासाची माहिती देत असतात. तो इतिहास इतका मनोरम आहे कीं त्या योगानें हजारों वाचक तल्लिन होऊन गेले आहेत.

हिंदुस्थानामध्यें पंजाबपासून तों मलबारपर्यंत सर्व ठिकाणीं ह्या कोकिलाचा प्रसार असून मोठमोठे जहागीरदार व राजेरजवाडे आणि हायकोर्ट जज्ज व इतर सर्व प्रकारचे लोक त्याचे आश्रयदाते आहेत. ह्याकरितां प्रत्येक महाराष्ट्रभाषाभिज्ञ रसिकानें कोकिलास अवश्य आश्रय द्यावा अशी आग्रहाची विनंति आहे.

**वर्गणीचे दरः**—मुंबईत रु. १. बाहेरगांवीं ट. ह. सह रु. १-३-०

**महाराष्ट्रकोकिल** व **मासिकवृत्तमाला** ह्या दोन्हीं पुस्तकांस जे मुंबईंत वर्गणीदार होतील त्यांस दोन्ही पुस्तकांबद्दल एकदम वर्गणी रु. १–१०–० व बाहेरगांवच्या वर्गणीदारांस ट. ह. सह रु. २ पडेल. वर्गणी खालील पत्त्यावर पाठवावी.

**पत्ता—मराठी लिटररी सोसायटी, गिरगांव पोस्ट, मुंबई.**

जुलै सन १९०? पासून प्रत्येक महिन्याच्या शेवटीं प्रसिद्ध होतें

# मासिक वृत्तमाला व विविधविषय

ह्या मासिक पुस्तकाची डेमी अष्टपत्री पानांची ... खालीं लिहिलेल्या विषयांचा दरमहा ... समावेश

मराठी ... मध्यें नवीन आले ... पत्रव्यवहार स्वदेशांत व परदेशांत राजकीय, सामाजिक ... ले या महत्वाच्या गोष्टी, संशोधक पुरुषांचे नवीन विचार, ... राजकीय उलाढाली, निरनिराळ्या प्रांतांमध्यें घडणारे नैसर्गिक चमत्कार, देशी ... देशीच्या न्यायकोर्टापुढें येणाऱ्या अद्भुत ... माहिती, वैद्यकसंबंधी महत्वाचे शोध, लोकस्थितीची हालहवाल, शिक्षणसंबंधानें उपयुक्त विचार, युद्धसंबंधी बातम्या, मद्रास, बंगाल, मुंबई वायव्य प्रांत, पंजाब, राजपुताना वगैरे सर्व ठिकाणची खबरबात युरोप, अमेरिका वगैरे खंडांतून तारायंत्र... आलेल्या महत्वाच्या बातम्या, अंमल... दारांच्या जुलमी वर्तनासंबंधानें प्रसिद्ध होणाऱ्या हकीकती, निरनिराळ्या सरकारां कडून प्रसिद्ध होणारे नवीन ठराव, ... कौन्सिलांतील महत्वाचे विषय, कुटुंब गृहस्थांस अवश्य लागणारी माहि... मुत्सद्यांचे आणि वर्तमानपत्रकार विचार, विश्वविद्यालयांतन होणा... विद्यार्थ्यांस उपयुक्त अशी माहिती ... वर्षांची अखेर माहिती, आणि एक दर महिन्यांत घडलेली ... विषयांचा ह्या पुस्तकांत संक्षेपेंकरून समावेश करून हें पुस्तक प्रतिमास ... त्या महिन्यांतील सर्व गोष्टींचें थोडक्यांत ... व्हावें अशी योजना केली आहे. पुष्कळ लोकांस सर्व वर्तमानपत्रें विकत घेण्याची शक्ति नसते व तितकी वाचण्यास फुरसत मिळत नाहीं, तेव्हां सर्वांच सोयीसाठीं हें मासिक पुस्तक आम्हीं प्रसिद्ध करीत आहोंत. ह्याच्या योगानें प्रत्ये महिन्यांतील एकंदर गोष्टी थोडक्या किंमतींत वाचावयास मिळून त्यांचा पुस्तकरूप संग्रह करून ठेवतां येईल. तेव्हां, अशा प्रकारच्या सर्वोपयुक्त मासिक पुस्तकास मराठी जाणणाऱ्या प्रत्येक गृहस्थाकडून ... आश्रय मिळेल अशी आमची पूर्ण ... आहे. पुस्तकाचा नियमितपणा, सुंदर छपाई, व ... बिहल योग्य ... येत असते.

वा... चे दर—मुंबईतील वर्गणीदारांस ।२ आणे । ... वर्गणीदारांस ... रु. १ मराठी ... ह्या पुस्तकाच्या ... वर्गणीदार ... नहीं पुस्तकांबद्दल फक्त रु ... १० आणे ... वर्गणीदा... पुस्तकांबद्दल ... रु. २ वर्गणी ...

... सर्व प्रकारचा पत्रव्यवहार करणें तो खालीं ...

**म्यानेजर, मराठी लिटररी सोसायटी, गिरगांव पोस्ट, मुंबई.**